Est. Sept 1994

2(f) & 12 (B): March 2006

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)

NAAC Accredited with Grade- B

(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000

Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

## Departmental Activity Report

- Name of the Department: Marathi Dept.

1. Name of the Activity: Lokshahir Annabhau sathe Jayanti.
2. Date: 01 August 2023
3. Place & Time: L.R.W (ACS) college sonpeth
4. Objectives of the Programme: To inform the students about biography and writting of L. Annabhau sathe. To understand the deprived Hero in his literature.
5. Guests/Resource Persons: Dr. santosh Rankham. prof. Dr. S.D sonsale. prof. sakharam Kadam.
6. Abstract of the Programme: Birth Anniversary of Lokshahir Annabhau sathe was celebrated on 1 August 23 in college primises on the behalf of Marathi Dept.
7. Total Beneficiaries: 57.
8. Achievements/ Outcomes: To change the sight of people to look at the deprived people.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

## मराठी विभाग

### शैक्षणिक वर्ष : २०२३-२४

| भाग - अ | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | १ |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती |
| दिनांक- | | १ ऑगस्ट २०२३ |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | अण्णा भाऊंच्या प्रतिमेचे पूजन<br>मान्यवरांचे मार्गदर्शन<br>मुक्त चर्चासत्र |
| उद्देश | १ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या चरित्र व लेखनाविषयी माहिती देणे. |
| | २ | अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनातील साम्यवादी जाणीव विशद करणे. |
| | ३ | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील उपेक्षित नायक समजून देणे. |
| | ४ | अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्मयाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करणे. |
| | ५ | अण्णाभाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केलेली फकीरा.. |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | डॉ. संतोष रणखांब, प्रोफेसर डॉ. सा.द. सोनसळे, प्रा. सखाराम कदम |
| उद्घाटक | | मा. प्राचार्य डॉ. वसंत सातपुते |
| ठिकाण | | |
| उपस्थिती | विद्यार्थी | ४७ |
| | कर्मचारी | ६ |
| | इतर | ४ |
| | एकूण | ५७ |

भाग - ब

उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक संक्षिप्त विवरण

१ ऑगस्ट 2023 रोजी महाविद्यालयाच्या कार्यालयासमोर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती कार्यक्रमाच्या आयोजन मराठी विभागाकडून करण्यात आले होते. यावेळी प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रतिमापूजनानंतर मराठी भाषा विषयाच्या सर्व विद्यार्थ्यांना एका हॉलमध्ये बसवून तेथे मान्यवरांच्या विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये 'कम्युनिस्ट कॉम्रेड अण्णा भाऊ साठे' या विषयावर प्रा.डॉ. संतोष रणखांब यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन उपस्थितांना केले. अण्णाभाऊंचा जीवन संघर्ष समजून घ्यायचा असेल तर त्यांनी लिहिलेली पुस्तके वाचणे आवश्यक असल्याचे ते यावेळी म्हणाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अण्णा भाऊंची कामगिरी स्पष्ट करतानाच त्यांचा अखिल मानवते बद्दलचा कळवळा, साम्यवादी जीवनदृष्टी, कामगार जीवनाबद्दलची आस्था, लालबावटा कलापथकाची परिणामकारकता या अनेक पैलूंबद्दल ते सविस्तर बोलले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सा.द. सोनसळे यांनी 'आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे' या अंगाने आपल्या विवेचनाची मांडणी यावेळी केली. अण्णाभाऊंनी बाबासाहेबांचे उपेक्षित समाजाच्या जीवन जागृतीतील योगदान लक्षात घेऊनच आपली बहुचर्चित 'फकीरा' ही कादंबरी त्यांना अर्पण केल्याचे ते यावेळी म्हणाले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. सखाराम कदम यांनी 'शाहीर व लेखक अण्णा भाऊ साठे' या अंगाने लोकशाहीर व थोर साहित्यिक अण्णा भाऊंचे साहित्यिक योगदान व महत्व उपस्थितांसमोर मांडले. या कार्यक्रमासाठी इतिहास विभागातील प्रा. डॉ. शिवाजी अंभुरे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. बालासाहेब काळे यांनी केले तर आभार आशिष शिंदे या विद्यार्थ्याने मानले.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता

उपेक्षितांच्या जगण्याकडे मानवीय दृष्टिकोनातून बघण्याचा प्रयत्न साध्य होईल.

कष्टकरी कामगारांच्या श्रम व वेदनेचे महत्व सगळ्यांच्या ध्यानात येईल.

दलित साहित्याची पूर्वबिजे अण्णाभाऊंच्या साहित्यात कशी मिळत होती? ते कळून येईल.

अण्णा भाऊ, त्यांचे लेखन व त्यातील उपेक्षित नायकाविषयी व्यापक सहानुभाव तयार होईल.

शाहिरी पोवाडे व लालबावटा कलापथकाचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान सांगता येईल.

भाग - क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ क्र | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | झालेला खर्च (रु ) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हार व पुष्पगुच्छ | ७० | |
| २ | गुलाल | १० | |
| ३ | सत्कारासाठी शाल | ८० | |
| एकूण खर्च | | १६० रू. | |

अहवाल सादर करणारी समिती:- **मराठी विभाग**

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | प्रा.डॉ. बालासाहेब काळे, मराठी विभाग प्रमुख | |
| समन्वयक | प्रोफेसर डॉ. सा.द.सोनसळे | |
| सदस्य | प्रा. सखाराम कदम<br>प्रा. सुरेश मोरे | |

अहवाल सदर केल्याचा दिनांक : ३० ऑगस्ट २०२३

Principal
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth, Dist. Parbhani

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

सोनपेठ (दर्शन) :- सोनपेठ येथील कै. र. व. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १ ऑगस्ट रोजी मराठी विभागाकडून बाल गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.शेख शकीला यांच्या हस्ते बाल गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन संपन्न झाले. महाविद्यालयातील सहकारी श्री पंजाब सुरवसे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालय परिवाराकडून त्यांना प्राचार्यांनी पुष्पगुच्छ देत शुभेच्छा व्यक्त केल्या. ग्रंथदानाच्या प्रथेनुसार पंजाब सुरवसे यांनी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अनंत सरकाळे यांच्याकडे ग्रंथदानासाठीची रक्कम सुपूर्द केली. यानंतर मराठी विभागाकडून



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ.संतोष रणखांब यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अण्णाभाऊंचा जीवन संघर्ष समजून घ्यायचा असेल तर त्यांनी लिहिलेले पुस्तकं वाचनं आवश्यक असल्याचे ते यावेळी म्हणाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अण्णा भाऊंची कामगिरी स्पष्ट करतानाच त्यांचा अखिल मानवतेबद्दलचा कळवळा, साम्यवादी जीवनदृष्टी, कामगार जीवना बद्दलची आस्था, लाल बावटा कलापथकाची परिणामकारकता. या अनेक पैलूबद्दल ते सविस्तर बोलले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रोफेसर डॉ. सा.द. सोनसळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. शिवाजी अंभु उपस्थित होते. प्रा. डॉ. संतोष रणखांब यांनी 'साम्यवादी अण्णा भाऊ साठे', प्रा. सखाराम कदम यांनी 'लोकशाहीर व लेखक अण्णा भाऊ साठे' तर प्रा.डॉ.सा.द. सोनसळे यांनी 'आंबेडकरवादी अण्णा भाऊ साठे' अशी आपल्या विवेचनाची त्रिविध मांडणी यावेळी करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. बालासाहेब काळे यांनी केले. तर आभार प्रा. सखाराम कदम यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील मराठी भाषा विषय असलेले अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani